सकाळ

# 'फोटोग्राफी ऑन व्हिल' प्रदर्शनाला प्रारंभ

## अनोखे प्रदर्शन ; जिल्हाधिकारी देसाई, कुलगुरू शिंदे यांनी केली पाहणी

कोल्हापूर, ता. १३ : प्रसिद्ध छायाचित्रकार पद्मश्री सुधारक ओलवे यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'फोटोग्राफी ऑन व्हील्स' हे अनोखे प्रदर्शन कोल्हापुरात आले आहे. आज शिवाजी विद्यापीठाच्या मानव्य शास्त्रासमोरील बागेमध्ये फोटो प्रदर्शन भरवले होते. ओलवे यांच्यासह ख्यातनाम छायाचित्रकारांचे फोटो, ओलवे यांचे होतकरू छायाचित्रकारांसाठी कार्यशाळा असे उपक्रमाचे स्वरूप आहे.

सध्या हे प्रदर्शन कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहे. आज मानव्यशास्त्र विभागाच्या समोरील बागेमध्ये हे प्रदर्शन भरवले. यामध्ये ओलवे यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या जीवनावरील प्रसिद्ध छायाचित्र मालिकेतील छायाचित्रे पाहावयास मिळतात. जिल्हाधिकारी दौलत देसाई, कुलगुरू देवानंद शिंदे यांनी प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी ओलवे यांनी त्यांना छायाचित्रांबरोबर या उपक्रमाचा उद्देशही सांगितला. प्रसिद्ध छायाचित्रकार इंद्रजित खांबे, नीलेश गावडे, प्रसिद्ध चित्रकार सुरेंद्र राव, अभिजित गुर्जर, रवींद्र अष्टेकर हे उपस्थित होते.



**कोल्हापूर : 'फोटोग्राफी ऑन व्हिल' प्रदर्शनाची माहिती जिल्हाधिकारी दौलत देसाई, कुलगुरू देवानंद शिंदे यांना देताना सुधाकर ओलवे.**

### फोटोग्राफी ऑन व्हिल चे स्वरुप

या उपक्रमाममध्ये मुलांना छायात्रिणाचे धडे सुधारक ओलवे यांच्याकडून मिळणार आहेत. तसेच कोकणातील निसर्गसौंदर्य असणाऱ्या ठिकाणी जावून छायाचित्रण करण्याची संधी प्राप्त होईल. तसेच ओलवे यांच्या बरोबर आलेले कलाकार हे या निमित्ताने येथील कलाकार, लेखक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. त्यातून येथील ग्रामीण महाराष्ट्राच्या माहितीचे संकलन केले जाणार आहे.

सकाळ

# सोशल मीडिया म्हणजे दुधारी शस्त्र

## जिल्हाधिकारी दौलत देसाई; विद्यापीठात वृत्तपत्र संवाद शास्त्र विभागात कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १३ : तरुण पिढीमध्ये सोशल मीडिया वापराचे प्रमाण जास्त आहे. निवडणूक काळात सोशल मीडिया म्हणजे दुधारी शस्त्र आहे, हे विसरून चालणार नाही. याचा सकारात्मक वापर झाला पाहिजे, असे आवाहन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी आज केले. जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन डिपार्टमेंट, पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर आणि कोल्हापूर प्रेस क्लबतर्फे आयोजित निवडणुका आणि सोशल मीडिया या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.**

जिल्हाधिकारी देसाई म्हणाले, ''सोशल मीडियाचे शस्त्र नागरिकांकडून आणि राजकीय पक्षांकडूनही वापरले जाते. सोशल मीडिया वापरताना कोणता कायदा, शिस्त पाळली पाहिजे, याची काळजी घेतली पाहिजे. सोशल मीडिया आणि मीडिया असे दोन प्रकार आहेत. मीडियामध्ये दिलेली बातमी उपसंपादक, संपादकांकडून दुरुस्त केली जाते.

सोशल मीडियावर अशी दुरुस्ती होत नाही. तरुणांना सोशल मीडियाचा खरा अर्थ कळला तर लोकशाही प्रगल्भ होईल. सोशल मीडियावर लोकांचे मत बनते; पण मीडिया आणि सोशल मीडियात फरक आहे. मीडियामध्ये एखाद्या वृत्ताची पडताळणी होते. सोशल मीडियामध्ये अशी पडताळणी होत नाही. त्यामुळे, सोशल मीडियावर प्रत्येक नागरिक हा पत्रकार असतो.''



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठमध्ये आयोजित निवडणुका आणि सोशल मीडिया या विषयावर बोलताना जिल्हाधिकारी दौलत देसाई. शेजारी कुलगुरू देवानंद शिंदे, रवींद्र चिंचोलकर, सुधाकर ओलवे.

कुलगुरू देवानंद शिंदे म्हणाले, ''सोशल असो की इतर मीडिया, एखादी माहिती समाजापर्यंत पोचवण्याचे काम केले पाहिजे. सोशल मीडियाचा चांगल्या वापरापेक्षा गैरवापर जास्त होत आहे. त्यामुळे तरुणांनी सोशल मीडियाचा गैरवापर करण्यापेक्षा चांगला वापर केला पाहिजे. सोशल मीडियाच्या वापराबाबत सर्वांवरच संस्कार करायची वेळ आली आहे. एखादी माहिती फॉरवर्ड करतो; पण ती वाचून किंवा चांगली असेल तर शेअर करावी. आलेली माहिती चूक की बरोबर हे न पाहताच तो फॉरवर्ड करतो. हे चुकीचे आहे.''

पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. निशा पवार, पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, विभागीय माहिती संचालक सतीश लळीत, आयटी तज्ज्ञ डॉ. राजेंद्र पारिजात, फोटोग्राफर पद्मश्री सुधाकर ओलवे, प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील उपस्थित होते. डॉ. शिवाजी जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Main
14/03/2019 Page No. 7

पुढारी

# लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी सोशल मीडियाचा योग्य वापर हवा


## जिल्हाधिकारी दौलत देसाई; 'निवडणुका आणि सोशल मीडिया' विषयावर चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भयमुक्त वातावरणामध्ये निवडणुका पार पाडण्यासाठी आणि भारतीय लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी सोशल मीडियाचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता सद्सद्विवेकबुद्धीने प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता व जनसंवाद अधिविभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांच्या वतीने 'निवडणुका आणि सोशल मीडिया' या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित या कार्यक्रमात जिल्हाधिकारी दौलत देसाई प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

जिल्हाधिकारी देसाई म्हणाले, देशामध्ये साधारण ९० कोटी मतदार



**कोल्हापूर : परिसंवादात बोलताना जिल्हाधिकारी दौलत देसाई.**

२०१९ च्या निवडणुकांमध्ये मतदान करणार आहेत. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये साधारणतः ३२ लाख ७५ हजार मतदार आहेत. यामध्ये १८ ते २९ या वयोगटामध्ये सहा लाख मतदार आहेत. सोशल मीडिया ही दुधारी तलवार आहे. नागरिक आणि राजकीय पक्षांकडून निवडणुकांमध्ये सोशल मीडियाचा वापर योग्य प्रकारे झाल्यास देशाची लोकशाही मजबूत होण्यास मदत होईल. सोशल मीडिया हे अदृश्य हातांनी हाताळले जाते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, वापरापेक्षा गैरवापराकडे सोशल मीडियाचा जास्त प्रमाणात वापर होताना दिसत आहे. सोशल मीडियाच्या वापराबाबत आचारसंहिता आलेली आहे. अशा वेळी समाजामध्ये जनजागृती आणि प्रबोधन करणे हे माध्यमांची कामे आहेत.

यावेळी पद्मश्री सुधाकर ओलवे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या पत्रकारिता अधिविभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. सहा. प्रा. डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी विभागीय माहिती संचालक सतीश लळीत, आयटीतज्ज्ञ राजेंद्र पारिजात, सोलापूर विद्यापीठाचे डॉ. रवींद्र चिंचोळकर, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील आदी उपस्थित होते.

14 MAR 2019
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोशल मीडियाचा योग्य वापर करावा

## जिल्हाधिकारी दौलत देसाई : फेक न्यूजवर निर्बंधासाठी आयटी ॲक्टमध्ये दुरुस्ती सुरु

प्रतिनिधी
कोल्हापूर

फेक न्युजवर कार्यवाही करण्यासाठी देशपातळीवर आयटी ॲक्टमध्ये दुरूस्ती करण्याचे काम सुरू आहे. सोशल मिडीयावर उमेदवाराची प्रसिद्धी अथवा तिरस्कार याग्य नाही. मिडीया मॉनिटरिंग कक्षाकडून प्रमाणिकरण करून घेतल्याशिवाय राजकीय पक्षांना, उमेदवारांना सोशल मिडीयावर प्रचार करता येणार नाही. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलतराव देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद अधिविभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'निवडणूका आणि सोशल मीडिया' या विषयावरील आयोजित व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

जिल्हाधिकारी देसाई म्हणाले, देशामध्ये साधारण ९०० दशलक्ष मतदार २०१९ च्या निवडणुकांमध्ये मतदान करणार आहेत. कोल्हापूर जिल्हयामध्ये साधारण ३२ लाख ७५ हजार मतदार आहेत. देशामध्ये सहाशे दशलक्ष मोबाईल इंटरनेट वापरकर्ते आहेत ते दिवसातील दोनशे मिनिटे सोशल मिडीयावर खर्च करतात. या माध्यमांद्वारे कमी वेळेत फार मोठ्या समुहापर्यंत संदेश पोहचू शकतो. सोशल मिडीयाच्या वापरामध्ये राजकीय पक्षांमध्ये सुसंगती असली पाहिजे. कारण राजकीय पक्षांकडून निवडणुकांमध्ये सोशल मिडीयाचा वापर योग्य प्रकारे झाल्यास देशाची लोकशाही मजबूत होण्यास मदत होईल.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, सोशल मिडीयाच्या वापराबाबत तरुण पिढी आणि सर्वच स्तरांमध्ये संस्कार करण्याची गरज आहे. समाज व देशामध्ये तेढ निर्माण होणार नाही यासाठी मेसेज फॉरवर्ड करीत असताना नेहमी जागृत असले पाहिजे. इंटरनेट हे सध्या जीवन जगण्यासाठीचे अनिवार्य साधन झालेले आहे. इंटरनेट, सोशल मिडीया या सारख्या महासागरामध्ये वावरताना संस्कार हेच योग्य होकायंत्र होवू शकते. विवेक, संवाद, सुसंवाद या त्रिसुत्रीचा उपयोग सोशल मिडीयाचा वापर करताना प्रत्येकाने केला पाहिजे.

पद्मश्री सुधाकर ओलवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या पत्रकारिता अधिविभागप्रमुख डॉ.निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ.शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी विभागीय माहिती संचालक सतीश लळीत, आयटी तज्ज्ञ राजेंद्र पारिजात, सोलापूर विद्यापीठाचे डॉ.रविंद्र चिंचोळकर, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील यांच्यासह विविध अधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी दौलत देसाई. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. निशा पवार, डॉ. रविंद्र चिंचोळकर आदी.

### छायाचित्र प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी

प्रसिध्द छायाचित्रकार पद्मश्री सुधाकर ओलवे यांनी मानव्यशास्त्र इमारत समोरील बागेमध्ये छायाचित्रांचे प्रदर्शन भरवले होते. समाजातील विदारकता आणि कटुसत्याचे चित्रण पाहण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थी, विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती.

लोकमत


## दौलत देसाई : शिवाजी विद्यापीठात निवडणुका व सोशल मीडियावर परिसंवाद

# लोकशाही मजबुतीसाठी सोशल मीडिया वापरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सोशल मीडिया म्हणजे दुधारी तलवार आहे. नागरिक आणि राजकीय पक्षांकडून निवडणुकांमध्ये सोशल मीडियाचा वापर योग्य प्रकारे झाल्यास देशाची लोकशाही मजबूत होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद अधिविभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांच्यातर्फे आयोजित परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील या



शिवाजी विद्यापीठात बुधवारी पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागातर्फे आयोजित परिसंवादात जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून निशा पवार, राजेंद्र पारिजात, सतीश लळित, देवानंद शिंदे, रवींद्र चिंचोलकर, सुधारक ओलवे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. 'निवडणुका आणि सोशल मीडिया' असा परिसंवादाचा विषय होता. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, सोशल मीडियाच्या वापराबाबत तरुण पिढी आणि सर्वच स्तरांमध्ये संस्कार करण्याची गरज निर्माण झाली आहे. विवेक, संवाद, सुसंवाद या त्रिसूत्रीचा उपयोग सोशल मीडियाचा वापर करताना प्रत्येकाने केला पाहिजे.

कार्यक्रमात छायाचित्रकार सुधारक ओलवे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विभागीय माहिती संचालक सतीश लळित, आयटी तज्ज्ञ राजेंद्र पारिजात, सोलापूर विद्यापीठाचे डॉ. रवींद्र चिंचोलकर, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील, आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या पत्रकारिता अधिविभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

# सोशल मीडियाचा योग्य वापर आवश्यक

## – जिल्हाधिकारी दौलतराव देसाई

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भयमुक्त वातावरणामध्ये निवडणुका पार पाडण्यासाठी आणि भारतीय लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी सोशल मीडियाचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता सद्सदविवेक बुद्धीने प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलतराव देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद अधिविभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'निवडणुका आणि सोशल मीडिया' या विषयावर सुवर्णमहोत्सवी एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन केले होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी देसाई बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

जिल्हाधिकारी देसाई म्हणाले, देशामध्ये साधारण नऊशे दशलक्ष मतदार २०१९च्या निवडणुकांमध्ये मतदान करणार आहेत. जिल्ह्यामध्ये साधारण ३२ लाख ७५ हजार मतदार आहेत. यामध्ये १८ ते १९ या वयोगटामध्ये ६ लाख मतदार आहेत. सोशल मीडियाचा वापर या तरुण नागरिकांमध्ये जास्त प्रमाणात आहे. सोशल मीडिया ही दुधारी तलवार आहे. सोशल मीडिया हे अदृश्य हातांनी हाताळले जाते. समाजाच्या भल्यासाठी याचा वापर झाला पाहिजे. या माध्यमांद्वारे कमी वेळेत फार मोठ्या समूहापर्यंत संदेश पोहोचू शकतो. सोशल मीडियाच्या वापरामध्ये राजकीय पक्षांमध्ये सुसंगती असली पाहिजे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये 'निवडणुका आणि सोशल मीडिया' विषयावरील परिसंवादात बोलताना जिल्हाधिकारी दौलतराव देसाई. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, पद्मश्री सुधाकर ओलवे, विभागीय माहिती संचालक सतीश लळीत यांच्यासह अन्य.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, वापरापेक्षा गैरवापराकडे सोशल मीडियाचा जास्त प्रमाणात वापर होताना दिसत आहे. सोशल मीडियाच्या वापराबाबत आचारसंहिता आलेली आहे. त्यावेळी समाजामध्ये जनजागृती आणि प्रबोधन करणे माध्यमांची कामे आहेत. समाजामध्ये, देशामध्ये तेढ निर्माण होणार नाही, यासाठी मेसेज फॉरवर्ड करत असताना नेहमी जागरूक असले पाहिजे. विवेक, संवाद, सुसंवाद या त्रिसूत्रीचा उपयोग सोशल मीडियाचा वापर करताना प्रत्येकाने केला पाहिजे.

याप्रसंगी, पद्मश्री सुधाकर ओलवे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक पत्रकारिता अधिविभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले.

### प्रदर्शनास प्रतिसाद

प्रसिद्ध छायाचित्रकार पद्मश्री सुधाकर ओलवे यांनी मानव्यशास्त्र इमारतीसमोरील बागेमध्ये छायाचित्रांचे प्रदर्शन भरवले होते. यावेळी विविध छायाचित्रांची अतिशय सुबक पद्धतीने झाडांखाली मांडणी करण्यात आली होती. समाजातील विदारकता आणि कटू सत्याचे चित्रण पाहण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि जिल्हाधिकारी दौलतराव देसाई यांनी पद्मश्री ओलवे यांच्या छायाचित्रांची आवर्जून पाहणी केली. या प्रदर्शनास विद्यार्थी, पत्रकारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला

यावेळी सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी विभागीय माहिती संचालक सतीश लळीत, आयटी तज्ज्ञ राजेंद्र पारिजात, सोलापूर विद्यापीठाचे डॉ. रवींद्र चिंचोळकर, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील यांच्यासह विविध अधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सोशल मीडियामुळे मानसिक आरोग्याचा ऱ्हास


## डॉ. राजेंद्र पारिजात; निवडणुका, सोशल मीडिया विषयावर विद्यापीठात सेमिनार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
सोशल मीडियामुळे सामाजिक आणि मानसिक आरोग्याचा ऱ्हास झाला आहे. यातून मोठ्या प्रमाणात माहिती संघर्ष होत आहे, असे प्रतिपादन माहिती तंत्रज्ञानाचे अभ्यासक डॉ. राजेंद्र पारिजात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता व जनसंवाद विभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांच्या वतीने 'आयोजित निवडणुका आणि सोशल मीडिया' या एकदिवसीय सेमिनारच्या दुसऱ्या सत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूरच्या जनसंवाद विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर होते.

डॉ. पारिजात म्हणाले, सोशल मीडियावरील माहिती अपुरी, अस्पष्ट आणि गोंधळ उडवून देणारी असते. किंबहुना तुकड्या तुकड्याने ही माहिती येत असल्याने नीट अर्थबोध होत नाही. बरीचशी माहिती भावनाप्रधान असते. त्यामुळे विचारशून्यता वाढते. विवेकाला थारा मिळत नाही. परिणामी, सामाजिक आणि मानसिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. निवडणूक आयोगाने आचारसंहिता जारी करून या अनुषंगाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

विभागीय माहिती संचालक सतीश लळीत यांनी सोशल मीडियाविषयी तपशिलाने माहिती दिली. निवडणूक



**कोल्हापूर : पत्रकारिता विभागाच्या वतीने आयोजित निवडणुका आणि सोशल मीडिया या विषयावरील सेमिनारमध्ये मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र पारिजात.**

आयोगाने सोशल मीडियावरील जाहिराती तसेच अन्य प्रचारकी स्वरूपाच्या मजकुरावर नियंत्रण आणले असून, याविषयीची सचित्र माहिती त्यांनी दिली. आयोगाच्या सीव्हीजील या ॲपद्वारे निवडणुकीतील गैरप्रकाराविषयी नागरिक तक्रार करू शकतात. या तक्रारींचा निपटारा शंभर मिनिटांच्या आत करण्याची तरतूद आहे, असेही लळीत यांनी नमूद केले.

डॉ. चिंचोलकर यांनी तरुणवर्गाने सोशल मीडियाचा वापर काळजीपूर्वक करावा, असे आवाहन केले. स्वागत विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले. आभार विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी मानले.

# 'विकासाचे यशवंतयुग' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व देशाचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे 'विकासाचे यशवंतयुग' पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमधील सहायक प्रा. तानाजी नामदेव घागरे यांनी हे पुस्तक लिहिले आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे विकासाचे यशवंतयुग पुस्तकाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. ए. एम. गुरव आदी.**

महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतरावांनी केलेले कार्य, राबविलेले धोरणे व घेतलेले कठोर निर्णय आदी अनेक पैलू 'विकासाचे यशवंतयुग' या पुस्तकातून उलगडले आहेत. घागरे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कारकिर्दीत शिक्षण, कृषी, सहकार, कृषी-औद्योगिकीकरण, सामाजिक सुधारणा व सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून केलेले विकासकार्य आदींचा सविस्तर आढावा या पुस्तकात घेतला आहे.

तत्पूर्वी, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नितीन माळी, डॉ. अमोल मिणचेकर यांच्यासह यशवंतराव चव्हाण स्कूलचे अन्य शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# संगवे स्मृती व्याख्यान आज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान आज, गुरुवारी सकाळी साडेअकरा वाजता मानव्यशास्त्र इमारतीत होणार आहे. त्यामध्ये भारतीय समाजशास्त्र सोसायटीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. आर. इंदिरा यांचे 'भारतातील गरिबी, सामाजिक असमानता आणि अन्याय' या विषयावर व्याख्यान होईल. दुपारी दोन वाजता समाजशास्त्र विभागातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा होणार आहे, अशी माहिती विभागप्रमुख प्रा. जगन कराडे यांनी दिली.

# 'शेड्युल्ड कास्ट इलाइट्स' ग्रंथाचे उद्या प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांच्या 'शेड्युल्ड कास्ट इलाइट्स' या संशोधन ग्रंथाचे प्रकाशन उद्या, शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजता दसरा चौकातील शाहू स्मारक भवनात होणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, भारतीय समाजशास्त्र सोसायटीच्या अध्यक्षा प्रा. आर. इंदिरा आणि बंगलोर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे संचालक प्रा. आर. एस. देशपांडे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ प्रा. उत्तमराव भोईटे असतील, अशी माहिती फुले-शाहू-आंबेडकर फोरमचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हरीश भालेराव यांनी दिली.

लोकमत

## रसिक मंत्रमुग्ध : अनेक मान्यवरांकडून विद्यार्थ्यांना संगीतविषयक मार्गदर्शन

# विद्यापीठात रंगला 'संगीत-नाटक' महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने शुक्रवारी संगीत-नाटक महोत्सव रंगला. त्यामध्ये रसिक, विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले.

या महोत्सवाचे उद्घाटन पुण्याच्या गायिका मधुवंती देव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी बबन माने आणि विद्यार्थ्यांच्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन यांच्या हस्ते झाले. विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. विभागाचे निखिल भगत यांनी विभागाच्यावतीने आभार मानले. अनुराधा तस्ते यांनी सूत्रसंचालन केले. उद्घाटनानंतर




**शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे संगीत-नाटक महोत्सव घेण्यात आला.**

गायिका मधुवंती देव यांनी मुलांना 'मैफिलीची पूर्वतयारी' याविषयी मार्गदर्शन केले. या सत्राची सुरुवात 'मिया की तोडी' या रागाने केली. त्यानंतर त्यांनी जौनपुरी आणि हिंडोल बहार हे राग सादर केले. मैफिलीसाठी रागांची निवड कशी करावी, स्वर काव्य, राग नाट्य, इत्यादी संकल्पनांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांना तबल्याची साथ दीपक दाभाडे, हार्मोनियमची साथ संदीप तावरे यांनी, तर तानपुऱ्याची साथ मैत्रयी साने, गौरी पाध्ये यांनी केली.

जयपूर अत्रौली घराण्याचे ज्येष्ठ गायक पंडित अरुण कुलकर्णी यांचा विभागातर्फे माजी विभागप्रमुख डॉ. भारती वैशंपायन यांच्या हस्ते विद्यापीठाचे मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी या सत्राची सुरुवात शुद्धसारंग रागांनी केली. त्यानंतर त्यांनी 'सावन की ऋतु' हा प्रसिद्ध दादरा, 'तर्ज सोहोनी' हा राग सादर केला. तबला साथ विभागातील निखिल भगत, हार्मोनियम साथ मधुसूदन शिखरे यांनी केली. तानपुऱ्याला साथ प्रल्हाद जाधव आणि आनंद धर्माधिकारी यांनी केली.

### 'कलासंगम' सादर

तिसऱ्या सत्रांत बारामतीचे नाट्य दिग्दर्शक अनिरुद्ध खुटवड यांनी 'नाटक व अभिनयातील मूलतत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर ज्ञानेश मुळे संकल्पना, दिग्दर्शित संगीत व नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी 'कलासंगम' कार्यक्रम सादर केला. संगीत, नाट्य, नृत्य व चित्रकलेच्या माध्यमातून तो आविष्कृत करण्यात आला.

## माहितीपट प्रदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग व विदेशी भाषा विभागाच्यावतीने 'धुक्यात हरवलेले लाल तारे' या रशियन माहितीपटाचे प्रदर्शन होणार आहे. शुक्रवारी (ता. १५ मार्च) दुपारी साडेबारा वाजता विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात हा माहितीपट दाखवण्यात येणार आहे. सोविएत रशियन बालसाहित्याच्या मराठी अनुवादांचा मागोवा या माहितीपटातून घेण्यात आला आहे. बालविकासात बालसाहित्याचे स्थान, मुलांच्या मानसशास्त्रावर पुस्तकातील कथांचा व चित्रांचा प्रभाव, मराठीतील बालसाहित्याचे भवितव्य, भाषांतर व रूपांतर यातील फरक अशा अनेक पैलूंचा वेध या माहितीपटातून घेण्यात येणार आहे.